www.esakal.com
सकाळ
सकाळ
सोमवार, १ ऑक्टोबर २०१८ | ३

# कोरेगावला गुरुवारी 'रयत' इमारतीचे उद्‌घाटन

**कोरेगाव** : विद्यापीठ अनुदान आयोगांतर्गत येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये बांधलेल्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन व महाविद्यालयाच्या नियोजित मुख्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांच्या हस्ते गुरुवारी (ता. चार) होणार आहे. या उद्‌घाटनाबरोबरच नियोजित मुख्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन गुरुवारी दुपारी अडीचला श्री. पवार यांच्या हस्ते होणार आहे. संस्थेचे शताब्दी वर्ष व महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे सहसचिव व प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले आहे.

भोसले ... महाविद्यालय ... कोरे...